| जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय नांदेड | |
|---|---|
| वेब साईट - www.nanded.gov.in | E-mail- nandedrdc@ gmil.com |
| Phone ०२४६२-२३५०७७ | Fax No- ०२४६२-२३८५०० शाखा - महसूल १ |
| क्र.२०२०/आरबी-१/डेस्क-२/टे-४/सिआर- | दिनांक १७.०३.२०२० |

**प्रति,**

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नांदेड

२) बाल विकास प्रकल्प अधिकारी, नांदेड

**विषयः-** कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजनेच्या अनुषंगाने नांदेड जिल्हयातील **ग्रामीण क्षेत्रातील आंगणवाडया बंद ठेवणेबाबत.**

**संदर्भः-**१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.कोरोना/२०२०/प्रक्र.५८/आरोग्य-५ दि.१४.०३.२०२०.

२) साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ चे खंड २,३ व ४

३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र. करोना २०२०/प्रक्र.५८/आरोग्य -५ दि.१४ मार्च,२०२०

४) या कार्यालयाचे समक्रमांकीत पत्र दि.१५.०३.२०२०.

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च,२०२० अधिसुचना निर्गमित केली आहे.

त्यानुसार या कार्यालयाचे संदर्भ क्र.४ वरील पत्रान्वये महानगरपालिका व सर्व नगरपालिका, सर्व नगरपंचायत क्षेत्रातील सर्व सरकारी व खाजगी आंगणवाडया, साथरोग प्रतिबंध कायदा १८९७ अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसुचना व नियमावली मधील तरतुदीनुसार दिनांक ३१ मार्च, २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत निर्देश दिले आहेत.

तथापि ग्रामीण भागात सुध्दा कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजनेचा एक भाग म्हणून नांदेड जिल्हयाच्या ग्रामीण भागातील देखील सर्व अंगणवाडया बंद ठेवण्याचे याव्दारे निर्देश देत आहे.

त्या अनुषंगाने आपणास सूचित करण्यात येते की, उपरोक्त सुचना लक्षात घेवून नांदेड जिल्हयातील ग्रामीण भागातील सरकारी व खाजगी आंगणवाडया, दिनांक ३१.०३.२०२० पर्यंत बंद ठेवण्यात याव्या व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(डॉ. विपीन इटनकर)भा.प्र.से.
**जिल्हादंडाधिकारी, नांदेड**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.
२) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद

**प्रतिलीपी, माहिती व कार्यवाहीस्तव**

३) पोलीस अधीक्षक, नांदेड यांना कार्यवाहीस्तव
४) जिल्हा शल्य चिकीत्सक, नांदेड.
५) सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
६) सर्व तालूका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा

**जिल्हादंडाधिकारी, नांदेड**